Consent H.M.P.30/...

Exh.No.19

**मा.दिवाणी न्यायाधिश साहेब (व.स्तर) माजलगाव यांच्या न्यायालयात**

एच.एम.पी.नं.23/2026

**अर्जदार** :- 1) **ईश्वरी भ्र.अमरसिंह देशमुख (लग्नानंतरचे नाव)**

**ईश्वरी पि.विलास तौर (लग्नापुर्वीचे नाव)**

2) **अमरसिंह पि.संजय देशमुख**

**विरुध्द**

**गैरअर्जदार** :- निरंक

**प्रकरण** :- **हिंदु विवाह कायदा 1955 चे कलम 13 (ब) अन्वये विवाह विच्छेदन होवून मिळणे बाबत.**

Order
Read and Recorded.

SAHEBRAO SHESHRAO BUDRUK
Digitally signed by SAHEBRAO SHESHRAO BUDRUK
Date: 2026.05.07 13:43:37 +0530

C.J.S.D. Majalgaon.

**अर्जदार नं.1 चे पुराव्याचे शपथपत्र**

मी प्रतिज्ञक ईश्वरी भ्र.अमरसिंह देशमुख (लग्नानंतरचे नाव) ईश्वरी पि.विलास तौर (लग्नापुर्वीचे नाव),वय : 22 वर्षे, धंदा : घरकाम, रा.ईट ता.भुम जि.धाराशिव, ह.मु.काळेगावथडी, ता.माजलगाव जि.बीड शपथेवर सत्य निवेदन करते की,

1) माझा व अर्जदार नं.2 यांचा विवाह हिंदु धर्मशास्त्र व जाती रुढी पंरपंरेनुसार दि.20/06/2023 रोजी सौभाग्य मंगल कार्यालय, गढी रोड माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे संपन्न झालेला आहे. माझे व अर्जदार नं.2 यांचे पतीपत्नीत्वाचे नाते अदयापही कायम आहे. लग्न संबंधातून आम्हाला कोणतेही मुलबाळ झालेले नाही अथवा आजरोजी मी अर्जदार नं.2 पासून गरोदर नाही.

2) मी लग्नानंतर अर्जदार नं.2 यांचेकडे ईट येथे नांदावयास गेले. मी व अर्जदार नं.2 हे पतीपत्नी म्हणून सोबत पंधरा दिवस राहिलो, परंतू मी व अर्जदार नं.2 हे एकमेकास समजुन घेत नसत, तसेच एकमेकास वेळ देत

नसल्यामुळे आमच्या स्वभावात मतभिन्नता होती. त्यामुळे आमच्यामध्ये आपसात पटेनासे झाले व आमचेमध्ये सतत मतभेद होवून भांडणे होवू लागले व सदर मतभेद जास्त वाढल्याने आमच्यामध्ये वितुष्ठ निर्माण झाले. माझे व अर्जदार नं.2 मध्ये कोणतेही धार्मिक विधी संपन्न झालेले नसुन आम्ही पतीपत्नी म्हणुन कधीच एकत्र आलो नाहीत. त्यावेळी मला व अर्जदार नं.2 यांना आमचे नातेवाईकांनी समजावून सांगून चांगला संसार करण्याची विनंती केली परंतू मी व अर्जदार नं.2 यांनी कोणाचेही काहीही ऐकले नाही.

3) मी व अर्जदार नं.2 हे सोबत एकत्र राहून संसार करू शकत नाहीत व पतीपत्नी म्हणून सोबत राहू शकत नाहीत त्यामुळे मला अर्जदार नं.2 च्या घरी जीवन जगणे अवघड झाले. त्यामुळे मी स्वईच्छेने दिनांक 06/07/2023 रोजीपासून अर्जदार नं.2 पासून वेगळे होवून माझे माहेरी आईवडीलांकडे काळेगावथडी ता.माजलगाव जि.बीड येथे राहत आहे.

4) त्यानंतर देखील माझे व अर्जदार नं.2 यांचे दोन्हीकडील नातेवाईकांनी माझे व अर्जदार नं.2 यांच्यामध्ये समेट घडवून आणण्याचा खुप प्रयत्न केला परंतू मी व अर्जदार नं.2 हे एकमेकांसोबत राहणार नाहीत म्हणून असे आमचे ठाम मत असून आम्हाला एकमेकांसोबत पतीपत्नी म्हणून राहणे जरुरीचे वाटत नाही तसेच भविष्यात आम्ही पतीपत्नी म्हणून एकत्र नांदू शकत नाही म्हणून दोन्ही कडील नातेवाईकांनी प्रयत्न करूनही मी व अर्जदार नं.2 मागील अडीच वर्षापासून जास्त काळ एकमेकांपासून विभक्त राहत आहेत, तसेच दोघांचे स्वभाव भिन्न असून मी व अर्जदार नं.2 हे एकत्र राहून संसार करू शकत नाहीत व कधी एकत्र येवु शकत नाहीत अशी दोघांनाही खात्री झालेली आहे.

5) अडीच वर्षापासून जास्त काळ मी अर्जदार नं.2 पासून विभक्त राहून आपले स्वतंत्र जीवन जगत आहे. मधल्या काळात आम्हाला असे जाणवले की, आता यापुढील काळात आमचे जीवन सुखाचे व समाधानाचे व्हावयाचे असेल तर दोघांनी आपआपसात असलेले पतीपत्नीत्वाचे नाते संमतीने व सहमताने कायमचे संपुष्ठात आणणे संयुक्तीक ठरणार आहे.

6) मी व अर्जदार नं.2 यांनी आजपर्यंतच्या आमचे वैवाहिक आयुष्यात एकमेकापासून मनःस्ताप भोगला आहे व सदरच्या प्रकारामुळे आमच्या घरात सतत निर्माण होणारे गोंधळ व स्थिरता या सर्व बाबींचा विचार करून मी व अर्जदार नं.2 यांनी पतीपत्नीत्वाचे नाते संपुष्ठात आणून एकमेकांपासून घटस्फोट घेवून विभक्त होण्याचा निर्णय घेतला आहे. मी व अर्जदार नं.2 हे आडीच वर्षापासून अधिक काळ पतीपत्नी या नात्याने कधीच एकत्र आलो नव्हतो व एकत्र राहिलो नाहीत. तसेच आम्ही यापुढे एकत्र राहणार नाहीत अशी खात्री आम्हाला पटली आहे.

7) माझे, अर्जदार नं.2 व आमचे नातेवाईकामध्ये दि.20/02/2026 रोजी बैठक होवून उभयंतामध्ये झालेल्या बैठकीमध्ये नातेवाईकासमक्ष मी व अर्जदार नं.2 यांनी आमचे वैवाहिक नाते कायमचे संपुष्ठात आणण्याचे ठरवले असून संमतीने घटस्फोट घेण्यासाठी मा.न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे.

8) मी अर्जदार नं.2 व त्याचे कुटुंबियाविरुध्द कोणत्याही न्यायालयात कोणत्याही प्रकारची दिवाणी फौजदारी व इतर तत्सम कायद्यान्वये पोटगी मिळण्यासाठी व वाढीव पोटगी मिळण्यासाठी कार्यवाही दाखल केलेली नाही व यापुढे ही करणार नाही, तसेच मी अर्जदार नं.2 च्या विरूध्द त्याचे स्थावर जंगम मालमत्तेबाबत कोणताही दावा किंवा अर्ज दाखल करणार नाही. मला यापुढे पोटगी मागण्याचा

अधिकार राहणार नसल्याचे मी मान्य केलेले आहे. तसेच मी माझे अर्जदार नं.2 ची पत्नी म्हणुन असणारे सर्व हक्क व अधिकार हे मी सोडुन देत आहे.

9) आमचा अर्ज मंजुर करुन माझा व अर्जदार नं.2 यांचा दिनांक 20/06/2023 रोजी झालेला हिंदु धर्मशास्त्र व जाती रुढी परंपरेनुसार झालेला विवाह संपुष्टात आल्याचे घोषीत करुन आम्हाला एकमेकापासून घटस्फोट देणे योग्य व न्याय आहे.

10) आमचा विवाह विच्छेदन झाले बाबत हुकुमनामा पारीत करण्यात यावा व ईतर योग्य तो न्यायाचा हुकम करण्यात यावा.

सबब हे पुराव्याचे शपथपत्र दिले आहे.

दिनांक : 7 /05/2026 प्रतिज्ञक

ठिकाण : माजलगाव.

ईश्वरी भ्र.अमरसिंह देशमुख (लग्नानंतरचे नाव)

ईश्वरी पि.विलास तौर (लग्नापुर्वीचे नाव)

शपथपत्रातील संपुर्ण मजकुर माझे जातीय माहिती व ज्ञानावर आधारलेला असून संपुर्ण मजकुर मी वाचून पाहिला व समजावून घेतला तो संपुर्ण मजकुर खरा व बरोबर असून मला मान्य व कबुल आहे. सबब ही तसदिक.

दिनांक : 7 /05/2026 प्रतिज्ञक

ठिकाण : माजलगाव.

मी प्रतिज्ञकेस ओळखतो,

ॲड.आर.आर.साबळे,

माजलगाव.

ईश्वरी भ्र.अमरसिंह देशमुख (लग्नानंतरचे नाव)

ईश्वरी पि.विलास तौर (लग्नापुर्वीचे नाव)

**<u>शपथेवर अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.१ ची सरतपासणी विधिज्ञ श्री. आर. आर. साबळे यांच्यामार्फत सुरुः-</u>**

११. प्रस्तुत पुरावा शपथपत्रातील संपुर्ण मजकुर मला आता वाचून व समजावून सांगितला. तो माझे माहिती व समजुतीप्रमाणे सत्य व बरोबर आहे. त्यावर माझ्या सह्या आहेत. आम्हा अर्जदारादरम्यान विनाअट तडजोडीद्वारे घटस्फोट घेण्याचे ठरले आहे. त्याविषयी, माझी कोणतीही तक्रार नाही.

सरतपास पुर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृत,

SAHEBRAO SHESHRAO BUDRUK

Digitally signed by SAHEBRAO SHESHRAO BUDRUK
Date: 2026.05.07 13:57:49 +0530

( सा. शे. बुद्रुक )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
माजलगाव.

दि. ०७/०५/२०२६.